नि.फौ.ख.- ३५१/२०२१
नि.क्र.२६

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव - सुरेश लक्ष्मण देवगिरे
वय - ५५ वर्षे,
व्यवसाय - शेती
राहणार - एम. आय. डी. सी. , ता. जि. अहिल्यानगर

सरतपासणी - सहा.सरकारी अभियोक्ता श्री. पी. के. पाटील

१. मी दोन वर्षांपासून एम. आय. डी.सी. अहिल्यानगर येथे राहतो. त्यापूर्वी मी कणगर येथे राहात होतो. माझी कणगर येथे गट क्र. ३०६/१ ही शेत मिळकत आहे. मी आरोपींना ओळखतो. आरोपींची शेती ही माझ्या शेतीच्या पाठीमागे आहे. घटना ही दि. २८/१२/२०२० रोजी सकाळी ८.१५ ते ८.३० वा. च्या सुमारास माझया घरी घडली. घटनेच्या वेळी मी माझ्या पत्नीच्या सोबत होतो. घटनेच्या दिवशी आरोपी क्र. १ हा घरी आला व म्हणाला की, आम्हांला रस्ता द्या. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, मी शेतीतून रस्ता देवू शकत नाही. त्यानंतर आरोपी क्र. १ हा घरी गेला व इतर आरोपी यांना बोलावून आणले. व त्यांनी मला मारहाण करण्यास सुरुवात केली. मला आरोपी क्र. १ सावित्रा वरघुडे, आरोपी क्र. २ अशोक वरघुडे, आरोपी क्र. ३ अमोल वरघुडे, आरोपी क्र. ४ प्रदीप वरघुडे यांनी काठने मला मणक्याला, पोटरीला व पाठीला मारहाण केली. मला मारहाण झाल्याने माझ्या पत्नीने माझी सुटका करण्याचा प्रयत्न केला असता तिलाही मारहाण केली. त्यानंतर आमच्या शेजारी असणारे संदीप लक्ष्मण आढाव यांनी माझी आरोपीच्या तावडीतून सुटका केली. त्यानंतर मी पोलिस स्टेशन येथे आलो. पोलिसांनी मला सुरुवातीला वैद्यकीय उपचारासाठी मेमो दिला. त्यानंतर मी वैद्यकीय उपचारासाठी सरकारी दवाखान्यात गेलो. आता मला वैद्यकीय उपचारासाठी जाण्यासाठीचा मेमो दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी २७ देण्यात येते. मी उपचार घेतल्यानंतर पोलिस स्टेशन येथे आलो. त्यानंतर मी फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. फिर्याद ला निशाणी २८ देण्यात येते. फिर्याद दिल्यानंतर पोलिस हे पंचनाम्यासाठी आले होते. मला ज्या लाकडी काठयांनी मारहाण करण्यात आली ते दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला तीन लाकडी दांडके दाखविण्यात आले. या दांडक्याने मला मारहाण करण्यात आली होती. त्यास मटेरियल ऑब्जेक्ट अ, ब, क देण्यात आले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी हे आज न्यायालयात हजर आहेत.

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. के. आर. घाडगे यांच्यामार्फत-</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. २१/०७/२०१२ रोजी मी आरोपींना माझा शेत गट क्र. ३०६/१ मधून आरोपीच्या गट क्र. ३५१/१, ३५१/२, ३५१/२/२ या मिळकतीमध्ये जाण्यासाठी १० फुट रस्ता त्यांना दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रस्ता हा नोटरी समक्ष दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता दिल्याबाबत आरोपींनी मला मोबदला दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी तहसिलदार यांच्या कोर्टात रस्ता केस क्र. १९/२०२१ माझ्या विरोधात दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, तहसिलदार यांनी रस्ता खुला करुन द्यावा म्हणून माझ्या विरोधात आदेश पारीत केला होता. हे म्हणणे खरे आहे की, तहसिलदार यांचया विरुध्द प्रांत कार्यालयात अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रांत कार्यालयात आमचा समझोता झालेला होता.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींविरुध्द मी राहुरी दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. ३१७/२०२२ दाखल केलेला आहे. शारदा देवगिरे ही माझी पत्नी आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/१२/२०२० रोजी सकाळी ८.१५ ते ८.३० वा. सुमारास आरोपी क्र. १ घरी आला व म्हणाला की, आम्हांला रस्ता द्या, मी त्यास रस्ता देणार नाही असे म्हणालो असता त्यांने मला मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाह की, आरोपी क्र. १ याने इतर आरोपी यांना बोलावून घेतले व त्यांनी मला व माझ्या पत्नीला मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपी क्र. १ सावित्रा वरघुडे, आरोपी क्र. २ अशोक वरघुडे, आरोपी क्र. ३ अमोल वरघुडे, आरोपी क्र. ४ प्रदीप वरघुडे यांनी काठने मला मणक्याला, पोटरीला व पाठीला मारहाण केली. मला मारहाण झाल्याने माझया पत्नी माझी सुटका करण्याचा प्रयत्न केला असता तिलाही मारहाण केली. त्यानंतर आमच्या शेजारी असणारे संदीप लक्ष्मण आढाव यांनी माझी आरोपीच्या तावडीतून सुटका केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीला मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे. संदीप आढाव हे माझे पाहुणे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, मी मोटारसायकलवरुन पडल्यामुळे माझ्या पाठीला, मणक्याला व पोटरीला दुखात झाली. हे म्हणणे खरे आहे की, मटेरियअल ऑब्जेक्ट अ ते क हे या प्रकारचे लाकडी दांडके सरपणासाठी वापरले जात होते. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपींनी लाकडी दांडके मटेरियअल ऑब्जेक्ट अ ते क यांनी मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, रस्त्याचा आदेश हा माझ्या विरोधात गेल्यामुळे मी आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडल्यानंतर पोलिस हे पंचनाम्यासाठी आले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दिली असून खोटी साक्ष देत आहे.

नि.फौ.ख.- ३५१/२०२१
नि.क्र.२६

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2025.09.10 15:25:58 +0530

(श्री. पी. एच. पाटील)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.३,राहुरी

राहुरी
दिनांक - ०८/०९/२०२५.